**<u>ठळक बातम्या</u>**

- जागतिक अर्थव्यवस्थेच्या स्थैर्यात भारत भक्कम आधारस्तंभ असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांचं प्रतिपादन

- तारा या स्वदेशी ग्लाईड शस्त्र प्रणालीची उड्डाण चाचणी यशस्वी

- राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेच्या नोंदणीकृत सदस्याची संख्या मार्चमध्ये १७ लाखांवर

- पश्चिम बंगालमधे विधानसभा विसर्जित

**आणि**

- अमेरिकेकडून इराणच्या लष्करी तळांवर हल्ले

**<><><><><>**

जागतिक अर्थव्यवस्थेच्या स्थैर्यात भारत एका भक्कम आधारस्तंभासारखी भूमिका बजावत असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस जयशंकर यांनी म्हटलं आहे. जयशंकर यांनी सुरीनाममध्ये विविध क्षेत्रांतल्या प्रतिनिधींना संबोधित केलं, त्यावेळी ते बोलत होते. आंतरराष्ट्रीय समृद्धीत भारत महत्त्वाचं योगदान देत असल्याचंही ते म्हणाले. प्रगतीची संकल्पना ही सीमांपलीकडे गेली पाहिजे, त्याला अनुसरूनच भारताची औद्योगिक आणि आर्थिक प्रगती केवळ देशापुरती मर्यादित नसून ती जागतिक स्थैर्याचं एक महत्वाचं साधन आहे असं ते म्हणाले.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं यावर्षीच्या जागतिक अर्थव्यवस्थेच्या वाढीबाबत व्यक्त केलेल्या अंदाजानुसार, २०२६ मध्ये जगभराच्या वास्तव सकल देशांतर्गत उत्पादनात भारत १७ टक्के योगदान देण्यासाठी सज्ज असून, जगातली सर्वात वेगानं वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून भारताचं स्थान कायम राहणार असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

संरक्षण संशोधन आणि विकास संस्था -डीआरडीओ आणि भारतीय हवाई दलाने संयुक्तपणे विकसित केलेल्या तारा या स्वदेशी ग्लाईड शस्त्र प्रणालीची यशस्वी उड्डाण चाचणी काल झाली. ओदिशातल्या समुद्रकिनाऱ्याजवळ झालेल्या या परिक्षणानंतर संरक्षणमंत्री

राजनाथ सिंह यांनी डीआरडीओ, आणि हवाई दलाचं अभिनंदन केलं आहे. मध्यम पल्ल्याची ही शस्त्र प्रणाली ही अचूक लक्ष्य नसलेल्या शस्त्रांना त्यांचे लक्ष्य निश्चित करण्यासाठी मदत करते. त्यामुळे कमी किमतीच्या शस्त्रांची उपयुक्तता वाढून जमिनीवरील लक्ष्य टिपण्यासाठी त्यांचा उपयोग करता येऊ शकेल.

<><><><><>

एनपीएस म्हणजे राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेच्या नोंदणीकृत सदस्याची संख्या मार्चमध्ये १७ लाखांवर पोचली आहे. या योजनेत जमा झालेला निधी १६ लाख कोटींवर पोचला आहे.

याशिवाय असंघटीत क्षेत्रातल्या नागरिकांसाठी असलेल्या अटल पेन्शन योजनेतली नोंदणीकृत सदस्य संख्यासुद्धा ८ कोटी ९६ लाखांवर पोचली आहे. बचत खाते किंवा पोस्टात खाते असलेल्या कोणत्याही व्यक्तीला ही योजना लागू आहे.

<><><><><>

केंद्रीय दूरसंचारमंत्री ज्योतिरादित्य शिंदे आज आणि उद्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. मुंबईतल्या अंधेरी रेल्वेस्थानक उप टपाल कार्यालयाचं उद्घाटन शिंदे यांच्या हस्ते आज होणार आहे. उद्या पुण्यात डीवाय पाटील विद्यापीठाच्या दिक्षांत समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून, तसंच पुण्यभूषण पुरस्कार सोहळयालाही ते उपस्थित राहणार आहेत.

<><><><><>

देशातील सरकारी धान्यसाठा सहा लाख ४० हजार टनांपेक्षा जास्त असून, हे प्रमाण आपत्कालीन परिस्थितीत आवश्यक असलेल्या साठ्याच्या तिप्पट असल्याचं ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी यांनी सांगितलं. गहू आणि तांदळाचा अतिरिक्त साठा देशातल्या कल्याणकारी योजना आणि सार्वजनिक वितरण प्रणालीसाठी अखंड पुरवठा सुनिश्चित करत असल्याचं जोशी यांनी समाजमाध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

तात्काळ आरोग्यसेवासंबधी प्राथमिक आरोग्य सेवकांना देण्यात येणाऱ्या सर्वंकष प्रशिक्षणाचा आरंभ केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी नड्डा यांच्या हस्ते झाला. आरोग्यसेवेचा दर्जा वाढवण्यासाठी तसंच उच्चतर आरोग्य सेवांवरचा भार कमी करण्यासाठी उत्तम प्रकारे

प्रशिक्षित असणाऱ्या खात्रीशीर आरोग्य सेवक उपलब्ध असायला हवेत, असं आरोग्य मंत्रालयाने याबाबत माहिती देणाऱ्या निवेदनात म्हटलं आहे. हा उपक्रम म्हणजे फक्त आरोग्यसेवेबाबतचं प्रशिक्षण नसून भारताच्या सार्वजनिक आरोग्यसेवेत धोरणात्मक गुंतवणूक असल्याचंही आरोग्य मंत्रालयानं नमूद केलं आहे.

**<><><><><>**

भारतात सार्वजनिक प्रसारण सेवेचा प्रारंभ झाल्याला यंदा ९० वर्ष  पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त देशभरात विविध कार्यक्रम होत आहेत.  २३ जुलै १९३६ या दिवशी स्थापन झालेल्या ऑल इंडिया रेडियो या सेवेचं नामकरण नंतर आकाशवाणी असं करण्यात आलं. दिल्लीच्या आकाशवाणी भवनापासून या निमित्त विशेष मॅरेथॉन काढण्यात आली. प्रसारभारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी, आणि आकाशवाणीचे महासंचालक राजीव कुमार जैन यांनी मॅरेथानला हिरवा झेंडा दाखवला. आकाशवाणी आणि दूरदर्शनचे अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येनं या उपक्रमात सहभागी झाले.  महासंचालक राजीव कुमार जैन म्हणाले.

..... **होल्ड- बाईट- जैन - - - -**

आकाशवाणी मुंबईतर्फे या निमित्त काल सूरसंध्या कार्यक्रम झाला.   पद्मविभूषण डॉ. एन राजम यांची मुलाखत आणि व्हायोलिन वादनाचा आनंद श्रोत्यांनी लुटला.

**<><><><><>**

पश्चिम बंगाल मधे निवडणूक प्रक्रीया पूर्ण झाल्याची अधिसूचना जारी झाल्यानंतर आणि सभागृहाचा कालावधी काल संपुष्टात आल्यानंतर राज्यपाल आर एन रवी यांनी विधानसभा विसर्जित केली आहे. याबरोबरच ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालचं सरकारही बरखास्त झालं आहे. नवीन सरकार स्थापनेसाठी आता बहुमत प्राप्त भाजपा दावा करेल. भाजपा विधीमंडळ पक्षाच्या नेता निवडीसाठी आज कोलकात्यात बैठक होत असून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह निरीक्षिक म्हणून बैठकीला उपस्थित आहेत. ओदिशाचे मुख्यमंत्री मोहनचरण मांझी सहनिरीक्षक आहेत. नवीन मुख्यमंत्र्यांचं नाव या बैठकीत ठरेल आणि उद्या नवीन मंत्रिमंडळाचा शपथविधी होईल.

आसाममधे नवनिर्वाचित भाजपा सरकार सत्ताग्रहणासाठी सज्ज असून येत्या १२ मे रोजी मंत्रिमंडळाचा शपथविधी होईल.

केरळमधे मुख्यमंत्रीपदासाठीच्या उमेदवाराची निवड करण्यासाठी यूडीएफमधे चाचपणी सुरु आहे.

<><><><><>

अमेरिकेनं इराणच्या लष्करी तळांवर हल्ले केल्याचं वृत्त आहे. इराणनं होर्मुझच्या सामुद्रधुनीत अमेरिकेच्या तीन युद्धनौकांवर हल्ले केले होते, त्याचं प्रत्युत्तर म्हणून हे हल्ले केल्याचं अमेरिकेनं म्हटलं आहे. अमेरिकेच्या हल्ल्यानंतर इराणची राजधानी तेहरानच्या पश्चिम भागात आणि दक्षिण इराणमधल्या बंदर अब्बास जवळ स्फोटांचे आवाज ऐकू आल्याचं वृत्त इराणमधल्या माध्यमांनी दिलं आहे.

अमेरिकेनं इराणच्या तेलवाहू जहाजावर हल्ला केला, त्यामुळे हा संघर्ष सुरु झाला असून, इराणनंही प्रत्युत्तरात क्षेपणास्त्र आणि ड्रोननं अमेरिकी जहाजांना लक्ष्य केल्याचं, आयआरजीसी या इरणाच्या लष्करी संघटनेनं म्हटलं आहे.

दरम्यान, संघर्ष वाढवण्याची अमेरिकेची इच्छा नाही मात्र, आपल्या लष्कराच्या संरक्षणासाठी आपण सज्ज असल्याचं अमेरिकेनं म्हटलं आहे.

<><><><><>

इराणला कधीही अण्वस्त्रसज्ज देश न होऊ देण्याच्या मुद्यावर अमेरिका आणि युरोपीय महासंघ परस्परांसोबत असल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. ट्रम्प यांनी युरोपीय आयोगाच्या अध्यक्ष उर्सुला वॉन डेर लेयन यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केल्यानंतर, समाज माध्यमावरून त्यांनी ही माहिती दिली. यावेळी पश्चिम आशियातल्या परिस्थितीवरही चर्चा झाल्याचं ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, उर्सुला वॉन डेर लेयन यांनीही इराणकडे अण्वस्त्र नसावीत ही भमिका मांडली आहे. प्रादेशिक स्थैर्य आणि जागतिक सुरक्षेच्या दृष्टीनं इराणचा अण्वस्त्र कार्यक्रम हा मोठा धोका असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीस सरसकट लागू केलेलं १० टक्के जागतिक शुल्क अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय व्यापार न्यायालयाने बेकायदेशीर ठरवून रद्द केलं आहे. यामुळे अमेरिकेच्या व्यापारविषयक धोरणाला मोठा धक्का बसला आहे. १९७४च्या व्यापार कायद्याच्या कलम १२२ अंतर्गत हे शुल्क योग्य ठरवण्यात प्रशासन अपयशी ठरले आहे.

व्यवहाराचं संतुलन साधण्यावर संकट आल्यामुळे हे शुल्क लागू केल्याचा युक्तिवाद ट्रम्प प्रशासनाने केला होता, मात्र तो सिद्ध करण्यात प्रशासन अयशस्वी ठरल्यानं हे शुल्क रद्द करण्याचा निर्णय न्यायालयाने घेतला आहे.

**<><><><><>**

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज दिल्ली कॅपिटल्सचा सामना कोलकाता नाईट रायडर्स सोबत होणार आहे. दिल्लीतल्या अरुण जेटली स्टेडिअमवर संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

दरम्यान स्पर्धेत काल झालेल्या सामन्यात लखनऊ सूपर जाएंट्सनं रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुवर ९ धावांनी विजय मिळवला. पावसाच्या व्यत्ययामुळे हा सामना प्रत्येकी १९ षटकांचा केला गेला होता. या सामन्यात बंगळुरुनं नाणेफेक जिंकून पहिली गोलंदाजी करायचा निर्णय घेतला होता. त्यानंतर लखनऊनंच बंगळुरुसमोर विजयासाठी २१० धावांचं आव्हान ठेवलं. विजयी लक्ष्याचा पाठलाग करताना बंगळुरु निर्धारीत १९ षटकात ६ बाद २०३ धावा करू शकला.

लखनऊच्या वतीनं मिशेल मार्श यानं १११ धावांची धडाकेबाज खेळी केली. त्याला सामनावीराच्या किताबानं गौरवलं गेलं.

**<><><><><>**

नाशिकच्या टीसीएस कंपनीतील धर्मांतर प्रयत्न प्रकरणातील फरार आरोपी नीदा खान हिला छत्रपती संभाजीनगर नगरातील नारेगाव इथून काल अटक करण्यात आली. नाशिक पोलिस पथकाने छत्रपती संभाजीनगर गुन्हे शाखेच्या मदतीनं ही संयुक्त कारवाई केली. दरम्यान, या सर्व प्रकरणाची एसआयटी चौकशी करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करणार असल्याचं पालकमंत्री संजय शिरसाट यांनी छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत सांगितलं.

**<><><><><>**

इडी म्हणजेच सक्तवसुली संचालनालयाने गेम्झक्राफ्ट टेक्नॉलॉजीज लिमिटेड आणि त्यांच्या सहकारी संस्थावर पैशाच्या बाबतीतली फसवणूक आणि अफरातफर यासाठी गुन्हा दाखल केला आहे.

***//<><><><><>//***